साप्रवि/गट-८(रवका)/न.क्र.३२७/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
**मुंबई - ४०००१९.**

## प्रशासकीय परिपत्रक क्र.२४ दि.३/३/२००६

विषय : आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात चांगल्या प्रकारे काम केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना पसंतीच्या ठिकाणी बदली देण्याबाबत.

वाचा : १) सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९
२) सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९ चे सु.प.क्र.१ दि.३.६.९१
३) सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९ चे सु.प.क्र.२ दि.३०.५.९२
४) सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९ चे सु.प.क्र.३ दि.२७.५.९३
५) सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९ चे सु.प.क्र.४ दि.३१.३.९५
६) सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९ चे सु.प.क्र.५ दि.६.११.९७
७) सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९ चे सु.प.क्र.६ दि.२७.३.२०००
८) प्रशासकीय परिपत्रक क्र.३५९ दि.२७.३.२००१
९) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.१.२००३ व सोबतचा शासन निर्णय दि.६.८.२००२.

.....

आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांना सा.आ.क्र.१२० (क) दि.१.७.८९ अन्वये शासनाच्या धोरणानुसार पूर्वीच्या मंडळाने 'प्रोत्साहन भत्ता' मंजूर केला आहे. तसेच शासनाच्या निर्णयानुसार सदर आदेशात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा संदर्भिय सुधारपत्र तसेच प्रशासकीय परिपत्रकानुसार स्वीकृत केल्या आहेत.

२. आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर त्या भागात चांगल्याप्रकारे काम केलेल्या वेतनगट १ व २ मधील अधिका-यांना दोन वर्षानंतर व वेतनगट ३ व ४ मधील कर्मचा-यांना तीन वर्षानंतर त्यांच्या मागणीनुसार त्यांच्या पसंतीच्या जिल्हयात बदली देण्याच्या सूचना असताना या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची संबंधित अधिका-यांनी दक्षता घ्यावी असे आदेश सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.टीआरएफ-२००५/प्र.क्र.६३/०५/१२,दि.७.१.२००६ अन्वये निर्गमित केले आहेत. सदर शासन परिपत्रकाची प्रत माहितीस्तव व काटेकोर अंमलबजावणीसाठी सोबत जोडली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालयाचे स्तरापर्यंत सर्वांना.

*K/F.N.664-70*
*22/2/06*

आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात चांगल्या प्रकारे काम केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना पसंतीच्या ठिकाणी बदली देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.टीआरएफ-२००५/प्र.क्र.६३/०५/१२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ७ जानेवारी, २००६.

संदर्भ : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टीआरएफ-२०००/एम/८/प्र.क्र.३/१२, दि.११/७/२०००,
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टीआरएफ-२०००/प्र.क्र.३/१२, दि.६/८/२००२,

## शासन परिपत्रक

आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर त्या भागात चांगल्या प्रकारे काम केलेल्या गट 'अ' व 'ब' च्या अधिकाऱ्यांना दोन वर्षानंतर व गट 'क' व 'ड' च्या कर्मचाऱ्यांना तीन वर्षानंतर त्यांच्या मागणीनुसार त्यांच्या पसंतीच्या जिल्ह्यात सोयीनुसार बदली देण्याबाबत संदर्भाधिन क्र.१ व २ येथील या विभागाच्या शासन परिपत्रक / निर्णयान्वये सर्व विभाग / प्रादेशिक विभाग / कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, सदर आदेशातील सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अतएवं संदर्भाधिन शासन परिपत्रक / निर्णयातील सूचनांचा पुन्हा पुनरुच्चार करण्यात येत आहे. सदर सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होईल याची सर्व मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख / प्रादेशिक विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी कृपया दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बा.बा.नारायणकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रती,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
वित्त विभाग,सेवा-५,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,